(०५)

# मुंबई विद्यापीठ

आस्थापना - १

क्र.आस्था-१/४१/ ०६ / २०११,
मुंबई - ४०० ०३२,
१२ जानेवारी, २०११.

परिपत्रक :-

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ४ (१) चे व महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ चे अंमलबजावणीबाबत.

संदर्भ :- १. परिपत्रक क्रमांक आरएस/पीआरओ/[illegible], दिनांक २५ ऑक्टोबर, २००५.
२. परिपत्रक क्रमांक आरएस/पीआरओ/१७/१३१-अ, दिनांक ११ नोव्हेंबर, २००५.
३. परिपत्रक क्रमांक आस्था.१/४१/४३९, दिनांक २ नोव्हेंबर, २००७.
४. परिपत्रक क्रमांक आस्था.१/४१/३१८, दिनांक ११ जुलै, २००८.

उपरोक्त विषयासंदर्भात कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांनी पत्र क्रमांक क्रमांक-संकीर्ण २०१०/(६२५/१०)-विशि-१, दिनांक : २३ नोव्हेंबर, २०१० नुसार राज्य माहिती आयोगाचे दिनांक १० ऑक्टोबर, २०१० रोजीचे पत्र विद्यापीठास अग्रेषित करून त्याप्रमाणे कार्यवाही करणेबाबत कळविले आहे.

त्या अनुषंगाने विद्यापीठातील सर्व विभागाचे संचालक, विभाग प्रमुख, सर ज.जी.वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल, परीक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, प्रभारी विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/ कक्षांचे प्रमुख यांना याद्वारे कळविण्यात येते की, माहितीच्या अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ अन्वये १७ बाबींवरील व अन्य काही स्वाधिकार/स्वयंप्रेरणेने (Sou-Moto Disclosure) प्रसिध्द करावयाच्या माहिती संदर्भात या पूर्वीही परिपत्रके प्रसारित केली आहेत, परंतु काही विभागांनी सदर बाबत आजपर्यंत कार्यवाही केलेली नाही. राज्य माहिती आयोगाच्या पत्राची प्रत आपल्या माहिती व कार्यवाहीस्तव या सोबत जोडली आहे.

त्या अनुषंगाने विनंती करण्यात येते की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ४ मधील १७ बाबींची स्वाधिकारे/स्वयंप्रेरणेने प्रसिध्द करावयाच्या माहितीबाबत त्वरीत कार्यवाही करावी. सदर माहिती विद्यापीठाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या विभागास त्वरीत पाठवावा म्हणजे शासनास एकत्रित अहवाल सादर करणे शक्य होईल.

(प्रा. एन.एम.चु-शाटे)
प्रभारी कुलसचिव

प्रति,
विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/ विभाग प्रमुख, सर ज.जी.वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल, परीक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख.

क्र.आस्था.१/४१/ ०६-अ /२०११,                    १२ जानेवारी, २०११.

(अ) प्रत माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित :-
१) प्रभारी संचालक, जमनालाल बजाज व्यवस्थापन संस्था,
२) संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग,
३) संचालक, शारिरीक शिक्षण आणि क्रिडा,
४) संचालक, प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार विभाग,
५) संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था,
६) संचालक, अकॅडेमिक स्टाफ कॉलेज,

२/-

(प्रत)

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग

क्रमांक: गुमाआ २००९/प्र.क्र.२०/०१
राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.

दिनांक :- १० नोव्हेंबर,२०१०.

प्रति,

प्रधान सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ४(१) चे व महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ चे अंमलबजावणीबाबत.

आयोगाकडे नागरिक पत्रव्यवहाराद्वारे तसेच तक्रारींच्या द्वारे सार्वजनिक प्राधिकरणातील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे तरतुदींचे सार्वजनिक प्राधिकरणाकडून अंमलबजावणी होत नाही अशा तक्रारी अधिनियमाचे कलम १८ (१) प्रमाणे दाखल करतात किंवा अधिनियमाचे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपीले दाखल होतात त्यावरून आयोगाचे असे निदर्शनास आले आहे की, सार्वजनिक प्राधिकरण [illegible] स्वतः करावयाची असूनसुध्दा पूर्णतः झालेली नाही व त्याकरिता कलम १९(८) प्रमाणे अधिनियमाचे अनुपालन करणे, सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक असतील, अशा उपाययोजना करण्यास सार्वजनिक प्राधिकरणास फर्मावण्याचे अधिकार राज्य माहिती आयोगास दिलेले आहेत. त्या अधिकारान्वये कलम ४(१) चे अंमलबजावणीबाबत सार्वजनिक प्राधिकरणांचे प्रमुखांना खालीलप्रमाणे फर्मावण्यात येते.

२. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ दिनांक १२-१०-२००५ रोजी अंमलात आला हे आपणास विदित आहेच. परंतु सदरचा नियम अंमलात येण्यापूर्वी अधिनियमाचे कलम ४ चे पोटकलम (१) च्या तरतुदी दिनांक १५ जून २००५ रोजी अंमलात आलेल्या आहेत. याचा अर्थ कलम ४ चे पोटकलम (१) च्या तरतुदीची अंमलबजावणी करण्याकरिता १२० दिवसांची मुदत अधिनियमाच्या तरतुदी पूर्णपणे अंमलात येण्यापूर्वी प्राथमिक तयारी म्हणून दिली होती. कलम ४ (१) मध्ये १७ उपकलमे आहेत व या १७ उपकलमांमध्ये त्या त्या सार्वजनिक प्राधिकरणातील व उपप्राधिकरणातील कार्यालयामधील कामकाजाची पध्दती व होणा-या कामकाजाबद्दल तसेच अधिकारी व कर्मचारी यांचेबद्दलची माहिती ही सर्व कार्यालयातील नोटीस बोर्डवर आणि अनुपानाचे उपलब्धतेनुसार संगणकीकरण करून त्या त्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून देणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. परंतु ५ वर्षे पूर्ण होत आली तरी याबाबत ब-याचशा सार्वजनिक प्राधिकरणामध्ये कार्यवाही झालेली आहे असे दिसून येत नाही.

३. कलम ४ (१) मध्ये स्वतः माहिती प्रसिध्द करण्याची जबाबदारी ही प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणावर टाकण्यात आलेली आहे. [illegible] ही प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रमुखाची जबाबदारी आहे असा होतो. आतापर्यंत कलम ४ (१) च्या तरतुदीतील अंमलबजावणी झालेली नाही असे आयोगाचे निदर्शनास आलेले आहे याचा अर्थ त्या त्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या, उपप्राधिकरणाच्या किंवा कार्यालयाचे प्रमुखांनी ही जबाबदारी पार पाडलेली दिसून येत नाही.

२/-

(प्रत)

महाराष्ट्र शासन

क्रमांक-संकीर्ण २०१०/(६१५/१०)-विशि-१,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :- २३ नोव्हेंबर,२०१०.

प्रति,
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई,
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे,
कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद,
कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर,
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर,
कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड,
कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई,
कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती,
कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव,
कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर,
कुलसचिव, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक,
कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक,

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ४ (१) चे व महाराष्ट्र सार्वजनिक, अभिलेख अधिनियम, २००५ चे अंमलबजावणीबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत राज्य माहिती आयोगाचे दिनांक १०-११-२०१० चे पत्र माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत पाठविण्यात येत आहे.

आपला,
सही/-
(विकास तु. कदम)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

(प्रत)

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग

क्रमांक: मुमाआ २००६/प्र.क्र.२०/०१
राज्य माहिती आयोग,
१३ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.

दिनांक :- १० नोव्हेंबर,२०१०.

प्रति,

प्रधान सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विषय :- <u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ४(१)चे व महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ चे अंमलबजावणीबाबत.</u>

आयोगाकडे नागरिक पत्रव्यवहाराव्दारे तसेच तक्रारींच्या व्दारे सार्वजनिक प्राधिकरणातील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे तरतुदींचे सार्वजनिक प्राधिकरणांकडून अंमलबजावणी होत नाही अशा तक्रारी अधिनियमाचे कलम १८ (१) प्रमाणे दाखल करतात किंवा अधिनियमाचे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपीले दाखल होतात त्यावरून आयोगाचे असे निदर्शनास आले आहे की, सार्वजनिक प्राधिकरण ... स्वतः करावयाची अंमलबजावणी पूर्णतः झालेली नाही व त्याकरिता कलम १९(८) प्रमाणे अधिनियमाचे अनुपालन करणे, सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक असतील, अशा उपाययोजना करण्यास सार्वजनिक प्राधिकरणास फर्मावण्याचे अधिकार राज्य माहिती आयोगास दिलेले आहेत, त्या अधिकारान्वये कलम ४(१) चे अंमलबजावणीबाबत सार्वजनिक प्राधिकरणाचे प्रमुखांना खालीलप्रमाणे फर्मावण्यात येते.

२. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ दिनांक १२-१०-२००५ रोजी अंमलात आला हे आपणास विदित आहेच, परंतु सदरचा नियम अंमलात येण्यापूर्वी अधिनियमाचे कलम ४ चे पोटकलम (१) च्या तरतुदी दिनांक १५ जून २००५ रोजी अंमलात आलेल्या आहेत. याचा अर्थ कलम ४ चे पोटकलम (१) च्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याकरिता १२० दिवसांची मुदत अधिनियमाच्या तरतुदी पूर्णपणे अंमलात येण्यापूर्वी प्राथमिक तयारी म्हणून दिली होती. कलम ४ (१) मध्ये १७ उपकलमे आहेत व या १७ उपकलमांमध्ये त्या त्या सार्वजनिक प्राधिकरणातील व उपप्राधिकरणातील कार्यालयामधील कामकाजाची पध्दती व होणा-या कामकाजाबद्दल तसेच अधिकारी व कर्मचारी यांचेबद्दलची माहिती ही सर्व कार्यालयातील नोटीस बोर्डवर आणि अनुदानाचे उपलब्धतेनुसार संगणकीकरण करून त्या त्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून देणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. परंतु ५ वर्षे पूर्ण होत आली तरी याबाबत ब-याचशा सार्वजनिक प्राधिकरणामध्ये कार्यवाही झालेली आहे असे दिसून येत नाही.

३. कलम ४ (१) मध्ये स्वतः माहिती प्रसिध्द करण्याची जबाबदारी ही प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणावर टाकण्यात आलेली आहे, याचा अर्थ ही प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रमुखाची जबाबदारी आहे असा होतो. आतापर्यंत कलम ४ (१) च्या तरतुदीतील अंमलबजावणी झालेली नाही असे आयोगाचे निदर्शनास आलेले आहे याचा अर्थ त्या त्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या, उपप्राधिकरणाच्या किंवा कार्यालयाचे प्रमुखांनी ही जबाबदारी पार पाडलेली दिसून येत नाही.

औरा.(?) /



४. कलम ४ (१) च्या तरतुदींची अंमलबजावणी केल्यास माहिती मागण्याचे प्रमाण हे कमी होऊ शकेल. एकूण उपकलमे १७ मधील माहिती जर कार्यालयातील नोटीस बोर्डवर किंवा संकेतस्थळावर उपलब्ध झाली किंवा कार्यालयात विशिष्ट कक्षात निरीक्षणार्थ उपलब्ध करून दिल्यास नागरिकांना ती माहिती मागण्याचे कारण राहणार नाही व मागितली तरी ती कार्यालयाचे नोटीस बोर्डवर आहे किंवा संकेतस्थळावर किंवा विशिष्ट कक्षात उपलब्ध आहे हे त्यांच्या निदर्शनास त्या त्या माहिती अधिकाऱ्यास आणता येईल, पर्यायाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या अर्जांचा बोजा हा कमी होऊ शकतो व तसेही ई गव्हर्नन्सच्या माध्यमातून संपूर्ण माहिती ही उपलब्ध झाल्यास माहितीचे प्रशासन, व्यवस्थापन, शासकीय अभिलेखाचे व्यवस्थापन, नागरिकांप्रती लोकसेवेची जबाबदारी व कर्तव्य शासकीय कामकाजातील पारदर्शकता व उत्तरदायित्व याबद्दलची स्पष्टता येईल. तसेच ही संपूर्ण माहिती खुली केल्यावर ती सतत अद्ययावत सुध्दा केल्यास नागरिकांनी त्यांच्यासाठी स्थानिक पातळीवर केव्हाही पाहता येईल. याकरिता शासनाने सुध्दा वेळोवेळी परिपत्रके काढलेली आहेत. वरील कलम ४(१) च्या तरतुदींचे पालन कसोशीने होण्याची गरज आहे असे आपणासही दिसून येईल व कलम ४ च्या पोटकलम (२),(३) व (४) च्या सूचनांची अंमलबजावणीची कार्यवाही केल्यास नागरिकांना अर्ज न करता माहिती उपलब्ध होईल असे आयोगाची खात्री आहे. त्यानुसार कार्यवाही त्वरीत झाली पाहिजे.

५. अधिनियमाचे कलम ५(१) च्या अर्जाप्रमाणे अर्जदारास ३० दिवसात माहिती मिळाली नाही किंवा अपूर्ण माहिती दिली इत्यादी कारणास्तव कलम १९(१) प्रमाणे त्याच प्राधिकरणाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे प्रथम अपील दाखल करण्याची तरतूद आहे व सदरचे अपील ३० दिवसांचे आत किंवा विशिष्ट परिस्थिती कारणासहित ४५ दिवसांचे आत निकाली काढण्याची तरतूद बंधनकारक आहे, परंतु बऱ्याच प्रथम अपिलीय अधिकारी हे वेळ वर अपीलाची सुनावणीच घेत नाहीत, माहिती अधिकारी यांनी माहिती द्यावी असा फक्त मोघम आदेश पारित करतात किंवा अपीलकर्ते हा गैरहजर असल्याचा अपील खारीज करतात, ही बाब कुठी अपील या प्रक्रियेच्या विरुध्द आहे. त्याच प्राधिकरणाचे वरिष्ठ अधिकाऱ्याकडे प्रथम अपील अधिकार देण्याचा उद्देश यात समस्येचा हेतु हा माहिती त्याच प्राधिकरणाच्या स्तरावर मिळाली पाहिजे असा आहे. परंतु प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या वरीलप्रमाणे कार्यपध्दतीमुळे माहिती तर मिळत नाहीच मात्र त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल होतात, याबाबत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर त्याच वेळात माहिती उपलब्ध करून द्यावी असे आदेश शासनाने देणे जरुरीचे झाले आहे. माहितीच्या अर्जांचा बोजा हा कमी होऊ शकतो व तसेही ई गव्हर्नन्सच्या माध्यमातून संपूर्ण माहिती ही उपलब्ध झाल्यास माहितीचे प्रशासन, व्यवस्थापन, शासकीय अभिलेखाचे व्यवस्थापन, नागरिकांप्रती लोकसेवेची जबाबदारी व कर्तव्य शासकीय कामकाजातील पारदर्शकता व उत्तरदायित्व याबद्दलची स्पष्टता येईल. तसेच ही संपूर्ण माहिती खुली केल्यावर ती सतत अद्ययावत सुध्दा केल्यास नागरिकांना ती त्यांच्यासाठी स्थानिक पातळीवर केव्हाही पाहता येईल. याकरिता शासनाने सुध्दा वेळोवेळी परिपत्रके काढलेली आहेत. वरील कलम ४(१) च्या तरतुदींचे पालन कसोशीने होण्याची गरज आहे असे आपणासही दिसून येईल व कलम ४ च्या पोटकलम (२),(३) व (४) च्या सूचनांची अंमलबजावणीची कार्यवाही केल्यास नागरिकांना अर्ज न करता माहिती उपलब्ध होईल असे आयोगाची खात्री आहे. त्यानुसार कार्यवाही त्वरीत झाली पाहिजे.

५. अधिनियमाचे कलम ५(१) च्या अर्जाप्रमाणे अर्जदारास ३० दिवसात माहिती मिळाली नाही किंवा अपूर्ण माहिती दिली इत्यादी कारणास्तव कलम १९(१) प्रमाणे त्याच प्राधिकरणाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे प्रथम अपील दाखल करण्याची तरतूद आहे व सदरचे अपील ३० दिवसांचे आत किंवा विशिष्ट परिस्थिती कारणासहित ४५ दिवसांचे आत निकाली काढण्याची तरतूद बंधनकारक

आहे. परंतु काही प्रथम अपिलीय अधिकारी हे एक तर अपीलाची सुनावणीच घेत नाही, माहिती अधिकारी यांनी माहिती द्यावी असा एका ओळीचा आदेश पारित करतात किंवा अपीलकर्ता हा गैरहजर असल्यास अपील खारीज करतात, ही सर्व कृती अपील या प्रक्रियेच्या विरुध्द आहे. त्याच प्राधिकरणाचे वरिष्ठ अधिका-यांकडे प्रथम अपील अधिकार देण्याचा उद्देश यात संसदेचा हेतू हा माहिती त्याच प्राधिकरणाच्या स्तरावर मिळाली पाहिजे असा आहे. परंतु प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या वरीलप्रमाणे कार्यपध्दतीमुळे माहिती तर मिळत नाहीच पण त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपीले दाखल होतात. याबाबत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर त्याच वेळेस माहिती उपलब्ध करून द्यावी असे आदेश शासनाने देणे जरूरीचे झाले आहे.

६. तसेच बहुतांश सार्वजनिक प्राधिकरणांमध्ये अनेक विकासांचे प्रकल्प व योजना क्षेत्रीय पातळीवर राबविल्या जातात. परंतु त्याबाबतची सांख्यिकी विवरणे एकत्रितपणे कोणत्याही प्राधिकरणाकडे वस्तुसूची, निर्देशांक उपलब्ध नसतात व माहिती मागितल्यावर संपूर्ण तालुक्यातून किंवा उपकार्यालयातून किंवा उपप्राधिकरणातून संकलित करण्याचा प्रयत्न केला जातो व तीस दिवसात अशी माहिती उपलब्ध करून देणे शक्य होत नाही.

७. अनेक कार्यालयांचे विभाजन केले जाते किंवा नवीन कार्यालये स्थापन केली जातात. त्यावेळेस अभिलेखांचे हस्तांतरण व त्याची नोंदणी योग्य रीतीने झालेली आढळून येत नाही व माहिती उपलब्ध होण्यास अडचणीचे होते. अभिलेखांचे संकलन, वर्गीकरण व नोंदणी करून विल्हेवाट लावण्याचे नियमांची माहिती व आदेश त्या कार्यालयातील कोणत्याही कर्मचा-यांस/अधिका-यांस ज्ञात नसते. याकडे प्रामुख्याने विभाग प्रमुखांनी अधीक्षण करणे आवश्यक आहे.

८. अभिलेख जतन करणे व नष्ट करणे याबाबत जी प्रतवारी करण्यात आलेली आहे त्याप्रमाणे सक्षम अधिका-यांचे आदेश प्राप्त करून कार्यवाही केली जात नसल्याने कागदपत्रे आढळून येत नाही असे मोघम उत्तर दिले जाते व त्यातून माहिती लपविली जात आहे असे आरोप होतात त्याकरिता योग्य ते आदेश काढून प्रशिक्षण आवश्यक आहे.

९. याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ ची अंमलबजावणी ही कसोशीने त्या त्या सार्वजनिक प्राधिकरणांच्या प्रमुखांनी करावी, त्यामुळे माहितीच्या अर्जानुसार माहिती ही ३० दिवसांचे मुदतीत उपलब्ध करून देता येईल.

१०. प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने १५ जानेवारी, २०११ पूर्वी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४(१) ची अंमलबजावणी केल्याचा अहवाल राज्य माहिती आयोगाचे कार्यालयात पाठवावा. जेणेकरून अधिनियमाच्या कलम ४ च्या अंमलबजावणीबाबत पूर्तता केलेल्या व न केलेल्या कार्यालयांची माहिती महाराष्ट्र विधान मंडळासमोर कलम २५(४) अन्वये सन २०१० कालावधीकरिता सादर होणा-या ५ व्या अहवालात समाविष्ट करून महाराष्ट्र विधानमंडळाचे निदर्शनास आणता येईल.

वरील आदेश विभाग प्रमुखांस अग्रेषित केलेले आहेत व त्यामुळे त्यांचे निदर्शनास आणावे, तसेच करण्याचे ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी टाळाटाळ केली असल्यास त्यांचे विरूध्द प्रशासकीय कारवाई करावी.

सही/-
( विलास पाटील )
मुख्य माहिती आयुक्त
महाराष्ट्र राज्य माहिती आयोग

## मुंबई विद्यापीठ

आस्थापना - १

क्र. आस्था. ए/ १५२३ /२०११,
मुंबई - ४०० ०३२,
२ मे, २०११.

प्रति,
विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/
विभाग प्रमुख, सर ज जी वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य,
विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल, परीक्षा नियंत्रक,
वित्त व लेखा अधिकारी आणि
कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख.

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ४ (१) चे व महाराष्ट्र सार्वजनिक, अभिलेख अधिनियम, २००५ चे अंमलबजावणीबाबत.

संदर्भ :- १. परिपत्रक क्रमांक आरटीआय/पीआयओ/१७/२३१, दिनांक २५ ऑक्टोबर, २००५,
२. परिपत्रक क्रमांक आरटीआय/पीआयओ/१७/१३२-अ, दिनांक १९ नोव्हेंबर, २००५,
३. परिपत्रक क्रमांक आस्था. ए/४ए/४३९, दिनांक २ नोव्हेंबर, २००७,
४. परिपत्रक क्रमांक आस्था. ए/४ए/४२८, दिनांक ११ जुलै, २००८,

महोदय,

उपरोक्त विषयासंदर्भातील आस्थापना विभागाने निर्गमित केलेले परिपत्रक क्र. आस्था ए/४ए/०५/२०११, दिनांक २६ जानेवारी, २०११ बाबत आपले लक्ष वेधण्यात येत असून सदर परिपत्रकाद्वारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ अन्वये १७ बाबींसंबंधीत व अन्य काही स्वाधिकारे/स्वयंप्रेरणेने (Sou-Moto Disclosure) प्रसिद्ध करावयाची माहिती संदर्भात या पूर्वीही परिपत्रके प्रसारित केली आहेत. परंतु अद्यापही विभागांनी सदर बाबत आवश्यक कार्यवाही केलेली नाही.

त्या अनुषंगाने विनंती करण्यात येते की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ४ मधील १७ बाबींचे स्वाधिकारे/स्वयंप्रेरणेने प्रसिद्ध करावयाच्या माहितीच्या संबंधित परिपत्रकात नमूद केलेल्या [illegible] मा. कुलगुरु यांच्या समवेत, गुरुवार, दिनांक ५ मे, २०११ रोजी दुपारी ३.०० वाजता, पदवीदान सभागृह, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२ येथे बैठक आयोजित करण्यात आली आहे.

सदर बैठकीत उपरोक्त परिपत्रकात नमुद केलेल्या आपल्या विभागाशी संबंधीत सर्व माहितीसह उपस्थित रहावे, ही विनंती. तसेच सदर माहिती Compact Disk आणि Hard Copy वर असावी.

(प्रा. एम.एल.कु-हाडे)
प्रभारी कुलसचिव

क्र. आस्था. ए/४ए/ १५२४ /२०११, २ मे, २०११

(अ) प्रत माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित :-
१) प्रभारी संचालक, जमनालाल बजाज व्यवस्थापन संस्था,
२) संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग,
३) संचालक, शारिरीक शिक्षण आणि क्रिडा,
४) संचालक, प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार विभाग,
५) संचालक, दुर व मुक्त अध्ययन संस्था,

२/-